लोकमत पू. पान क्र. 1



बिहार राज्यात खून करून पळून आलेल्या आरोपीला अटक करण्यात नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. अटकेतील आरोपीसह नायगावच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी.

# बिहारचा खुनी नायगावमध्ये जेरबंद

## चिंचोटीतून अटक : नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** बिहार राज्यात निर्घृणपणे खून करून पळून आलेल्या आरोपीला नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी दिली.

बिहारच्या नवादा जिल्ह्यातील रोह पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बारापांडे गावातील सरितादेवी रंजक या त्यांचे पती सुनील रंजक हे हरवल्याची तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात आल्या होत्या. त्याचवेळी या गावाच्या हद्दीत सहा तुकड्यांत कापलेला पुरुषाचा मृतदेह सापडला होता. हा मृतदेह सरितादेवींना दाखविल्यावर तो पतीचाच असल्याचे त्यांनी ओळखले.

■ संशयित आरोपी चिंचोटी परिसरात आल्याची माहिती बिहार पोलिसांनी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले - श्रींगी यांना कळविली. त्यांनी ही माहिती नायगावचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे यांना कळवून आरोपीला पकडण्याचे आदेश दिले. नायगाव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी दोन पथके तयार करून आरोपीची कसून शोध मोहीम सुरू केली. संशयित आरोपी सुजित उर्फ सुरज सिंग (३१) हा चिंचोटीच्या पाटीलपाडा येथील साडी कंपाउंड येथे सापडला.

■ आरोपीकडे चौकशी केल्यावर त्याने हा गुन्हा साथीदार रंजनिश शर्मा याच्या मदतीने केल्याची कबुली दिली आहे. ही हत्या त्याने सरितादेवी हिच्या सांगण्यावरून केली असल्याचे सांगितल्यानंतर नायगाव पोलिसांनी बिहार पोलिसांना आरोपी रंजनिश शर्मा आणि मृतकाची पत्नी सरितादेवीला ताब्यात घेण्यासाठी कळविले.

■ आरोपीने अजून काही अशाच प्रकाराचे गुन्हे केले आहेत का, याबाबत अधिक चौकशी केल्यावर त्याने १६ वर्षांपूर्वी जुन्या भांडणाचा मनात राग धरून बिहारच्या मौजे बरडकी खारांकला या गावचा मुखिया राजकुमार कानू आणि त्याचा मित्र यादव यांचा दुहेरी खून केल्याची कबुली दिली.

■ याबाबत सहर पोलिस ठाण्यास कळविले असून, आरोपीला कायदेशीर कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# अश्लील हावभाव; गुन्हा दाखल




**नालासोपारा :** सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव केल्याप्रकरणी वसईत दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पश्चिम बस डेपोजवळील रिक्षा स्टँडजवळील स्कायवॉकच्या पायरीवर मंगळवारी संध्याकाळी ३२ ते ४५ वयोगटातील दोन महिला अश्लील हावभाव व अंगविक्षेप करून पुरुष गिऱ्हाईकांना आकर्षित करीत असल्याची माहिती माणिकपूर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार माणिकपूर पोलिस ठाण्याच्या महिला पोलिस वर्षा शिंदे यांनी घटनास्थळी दाखल होत दोन्ही महिलांना ताब्यात घेऊन कारवाई केली आहे.

# बांधकाम तोडायला लावले म्हणून मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अनधिकृत बांधकाम तोडायला लावले म्हणून मारहाण केल्याची घटना घडली आहे. काशीगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

काशीगावच्या माशाचा पाडा रोडवर नीलकंठ इमारत येथे राहणारे सूर्यनारायण कोनार यांना सलूनवाला शर्मा, यादव आणि त्याचा मुलगा या तिघांनी प्लास्टिक जाळीने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. सूर्यनारायण यांनी शर्मा सलूनच्या मागील अनधिकृत बांधकाम महापालिकेस तक्रार करून तोडायला लावले म्हणून त्याचा राग येऊन मारहाण केल्याचा गुन्हा तिघांवर दाखल झाला आहे. पोलिस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# वालीवमध्ये डम्परची चोरी

**नालासोपारा :** २४ ते २६ मार्च दरम्यान फादरवाडीच्या एचपी पेट्रोलपंपासमोर उभा करून ठेवलेला ६ लाख रुपये किमतीचा डम्पर चोरीला गेला आहे. चोरट्याने पार्क केलेला हा डंपर उघड्यावरून चोरी केल्याने गगनदीप काला (३२) यांनी मंगळवारी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. वालीव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# बंद गाळ्यातून सामानाची चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** येथील वाकणपाड्याच्या चौधरी कंपाऊंड-मधील एका बंद गाळ्याच्या शटरचे लॉक तोडून चोरट्यांनी सामान चोरून नेल्याची घटना २४ मार्चला रात्री घडली आहे.

चोरट्याने दुकानातील दोन ड्रिल मशीन, हँन्ड सँडिंग मशीन, ब्लोअर, हँड कटर मशीन, राऊटर किट, ४ सँडिंग पट्टा, १० ग्रीडर पेपर, चाय किटली आणि राऊटर मशीन असा एकूण १० हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल घरफोडी करत चोरी करून नेला आहे. सोनी सिंग (४०) यांनी मंगळवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner


लोकमत पु. पान क्र. १

## अल्पवयीन मुलीचे अपहरण



नालासोपारा : शहराच्या पूर्वेकडील तुळींज रोड परिसरात राहणाऱ्या १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सोमवारी सकाळी अज्ञात आरोपीने तिचा अज्ञातपणाचा फायदा घेऊन कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची तक्रार तिच्या आईने मंगळवारी तुळींज पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे. तुळींज पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## गळफास लावून आत्महत्या



नालासोपारा : संतोष भवन येथील नर्मदा पाटील चाळ येथे राहणारे सनी विश्वकर्मा (३३) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी सोमवारी रात्री २ वाजण्याच्या सुमारास दारूच्या नशेत राहत्या घरी साडीने गळफास लावून घेतला. घरच्यांनी त्यांना उपचारासाठी तुळिंज येथील मनपा हॉस्पिटलमध्ये नेले. तेथील डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. पेल्हार पोलिसांनी मंगळवारी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## तरुणाची बॅग जबरीने खेचली

नालासोपारा : कारगिलनगरच्या गणेश चौकातील जीवदानी संकुल बिल्डिंग नंबर २ मध्ये राहणाऱ्या उद्धव तावडे (२३) या तरुणाच्या पाठीवरील बॅग दोन चोरट्यांनी जबरीने खेचून नेल्याची घटना घडली आहे. मंगळवारी सकाळी विरार रेल्वे स्टेशनकडे पायी जात असताना मनवेलपाडा येथील गोविंद अपार्टमेंटजवळ तो पोहोचला. त्यावेळी पाठीमागून आलेल्या दोन चोरट्यांनी त्याच्या पाठीवरील बॅग जबरीने खेचून पळून गेले. त्या बॅगमध्ये ७ हजारांचा मोबाइल, ६०० रुपये रोख आणि कामावरील कपडे होते. विरार पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान क्र. ३

लोकमत पु. पान क्र. ३

## बंद घराचे कुलूप तोडून चोरी

मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन येथील करईपाडा येथील इमारतीतील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने २० हजारांचा ऐवज पळविला आहे. श्री सेंट अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या गंगाधर म्हस्के (वय ६७) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने चांदीचे पैंजण, रोख असा सुमारे २० हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सोनवलकर हे तपास करीत आहेत.

## आरोपीला मदत करण्यासाठी १० लाखांची मागितली लाच

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : अरुणाचल प्रदेशच्या आरटीओकडे बनावट कागदपत्रांद्वारे वाहनांची नोंदणी करून तिकडून नाहरकत घेऊन वाहनांची नोंदणी वसई प्रादेशिक परिवहन विभागात करून शासनाची फसवणूक करणाऱ्या आरोपीला मदत करण्यासाठी १० लाखांची लाच मागणाऱ्या मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट-१ चा सहायक पोलिस निरीक्षक कैलास जयवंत टोकले (४१) विरुद्ध काशिमीरा पोलिस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ डिसेंबर २०२३ रोजी विरार पोलिस ठाण्यात प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक उज्ज्वल भावसार यांच्या फिर्यादीवरून प्रवीण राऊतविरोधात गुन्हा दाखल झाला होता. अरुणाचल प्रदेश राज्यातील आरटीओकडे बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहनांची नोंदणी करून त्या कागदपत्रांच्या आधारे वसई प्रादेशिक परिवहन कार्यालयात ३४ वाहने नोंदणी करून शासनाची फसवणूक केल्याबद्दल हा गुन्हा दाखल झाला होता.

### आरोपी न्यायालयीन कोठडीत

या गुन्ह्याचा तपास मीरा-भाईंदर गुन्हे शाखा-१ काशिमीरा युनिट करत होते. तपासात रामकैलास लालबहादूर यादवला अटक केली होती. गुन्ह्यातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. सहायक पोलिस निरीक्षक कैलास टोकले याने आरोपी यादव याला जामीन मंजूर व्हावा, गुन्ह्यातील कागदपत्रे आरोपीच्या सोयीने बनवण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी त्याच्या भावाकडे केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणेच्या पथकाने पडताळणी करून खात्री केली होती.

CamScanner

पुढारी पृ. पान क्र. ।

## जमिनीच्या वादातून तुंबळ हाणामारी

पालघर : वालीव परिसरामध्ये खैरपाडा येथे जमिनीच्या विवादातून दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याचा प्रकार घडला. या प्रकारामध्ये सात जण गंभीरित्या जखमी असून वालीव पोलिसांनी १५ जणाविरुद्ध विविध कलमाखाली गुन्हे दाखल केले आहेत. मुंबई भायखळा येथील ३४ वर्षीय नीरज चौधरी यांची खैरपाडा येथे असलेल्या खदानी जवळ जमीन आहे. या जमिनीवर त्यांचा सावत्र भाऊ चंद्रकांत चौधरी आपला दावा सांगत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या जमिनीच्या दाव्या प्रति दाव्यांबाबत वादविवाद सुरू आहेत. रविवारी रात्रीच्या सुमारास चंद्रकांत चौधरी सात आठ लोकांना घेऊन या जमिनी जवळ पोहोचला. तिथे उपस्थित असलेल्या व्यक्तींना मारहाण करू लागला. या प्रकारानंतर दोन गटांमध्ये जोरदार मारामारी सुरू झाली. गाडींची, वाहनांची,साहित्याची तोडफोड झाल्याची ही बाब समोर येत आहे. घर, कार्यालय व इतर साहित्याचे नुकसान झाले आहे. पोलिसांनी दोन्ही गटांच्या १५ जणांनी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## ट्रेडिंग कंपनीचा साडे नऊ लाखांना गंडा

पालघर : एका ट्रेडिंग कंपनीने ४१ वर्षीय व्यक्तीची साडे नऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. नोव्हेंबर ते आतापर्यंत हा प्रकार चंद्रकांत जावळे यांच्यासोबत घडला आहे.एका ट्रेडर्स एक्सपर्ट कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी असल्याची बतावणी करून मोबाईलमध्ये ट्रेडिंग अकाउंट काढायला व डाउनलोड करायला लावून जावळे यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने हे पैसे घेतले गेले आहेत. मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारचा परतावा दिला नाही. ट्रेडिंगच्या नावाखाली गुंतवलेले पैसे घेऊन आपली फसवणूक झाल्याची लक्षात येताच जावळे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात सोमवारी तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## तलावात बुडून मृत्यू

पालघर : विरार पोलीस ठाणे क्षेत्रातील कुंभार पाडा परिसरात असलेल्या तलावात पडून एका मद्यपीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. विरार गासकोपरी येथील ३५ वर्षीय रवींद्र बेलोंडे सोमवारी होळी साजरा करण्यासाठी आपल्या मावसभाऊ सोबत तलावाकडे गेला होता. तिथे दारूच्या नशेत धुंद होऊन दुपारी तो तलावात उतरला. तो पोहू शकला नसल्याने बुडून त्याचा मृत्यू झाला. माहिती मिळाल्यानंतर वसईच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून रवींद्र याला बाहेर काढून त्याचे शव शवविच्छेदनासाठी पाठवले. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असून पुढील तपास सुरू आहे.

## पाण्यात बुडून अल्पवयीनाचा मृत्यू

पालघर : वालीव पोलीस ठाणे क्षेत्रात उंबरपाडा येथे राहणाऱ्या अख्तर सिद्धीकी या १५ वर्षीय अल्पवयीन मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी धुळवड खेळल्यानंतर तो एका खदानित पोहण्यासाठी गेला होता. पाण्यात पोहताना बुडून त्याचा मृत्यू झाल्याची बाब समोर आली असून वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## अर्नाळा पोलिसांचे नशामुक्ती अभियान

पालघर : शालेय पिढी व तरुण मंडळी व्यसनाच्या आहारी जात असल्याचे प्रमाण मोठे आहे. नशेपासून परावृत व्हावे तसेच नशा मुक्ती बाबतची जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून अर्नाळा पोलिसांनी नशा मुक्ती अभियान राबवत होळीचे दहन केले. शालेय विद्यार्थी, तरुण वर्ग यावेळी उपस्थित होता. अर्नाळा वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांच्या संकल्पनेतून ही प्रतिकात्मक होळी दहन करण्यात आली.

CS CamScanner

पुढारी पान क्र.5

# चौकच्या वादग्रस्त दर्ग्याप्रकरणी शासकीय यंत्रणांना नोटीस

## २४ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील उत्तनच्या चौक येथील सरकारी जागेत तसेच तेथील कांदळवन नष्ट करून विनापरवानगीने बांधलेला हजरत सय्यद बाले पीर शाह दर्गा अनधिकृत असल्याने त्यावर कारवाई करण्याबाबतच्या दाखल जनहित याचिकेवर बुधवारी उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. आरिफ एस. डॉक्टर याच्या खंडपीठापुढे सुनावणी पार पडली. त्यावेळी खंडपीठाने संबंधित शासकीय यंत्रणांना नोटीस बजाविली. त्यात त्या दर्ग्यावर अद्यापपर्यंत कारवाई का केली नाही, त्याचे प्रतिज्ञापत्र २४ एप्रिल पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले.

मिरा-भाईंदर हिंदू समाज सभेचे ॲड. खुश खंडेलवाल यांनी २ मार्च रोजी हि याचिका दाखल केली. त्यात त्यांनी या दर्ग्यावर कारवाई करण्यासाठी पालिकेसह पोलीस व महसूल विभागाकडे सतत पत्रव्यवहार करूनही कारवाई करण्यात आली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. तत्पूर्वी मिरा-भाईंदरचे अप्पर तहसिलदार निलेश गौंड यांनी १२ मार्च रोजी दर्ग्याचे व्यवस्थापन पाहणारे बाले पीर शाह ट्रस्टचे सचिव अब्दुल कुरेशी यांना नोटीस बजावली होती. त्यात त्यांनी दर्ग्याचे बांधकाम हटविण्यासाठी २२ मार्च



पर्यंतचे अल्टिमेटम ट्रस्टला दिले होते. यानंतरही दर्ग्याचे बांधकाम न हटविल्यास त्यावर महसूल विभागाकडून कारवाई करून त्याचा खर्च ट्रस्टकडून वसूल करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र हा इशारा कागदावरच राहिल्याने अखेर खंडेलवाल यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यात त्यांनी राज्य शासनासह, जिल्हाधिकारी, महसूल विभागाचे अप्पर तहसीलदार, मीरा-भाईंदर/वसई-विरार पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर महापालिकेकडे सतत पत्रव्यवहार करुनही दर्ग्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. तो ग्राह्य धरून त्यावर आपले म्हणणे मांडण्यासाठी उच्च न्यायालयाने संबंधित शासकीय यंत्रणांना २४ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी बुधवारी पार पडलेल्या सुनावणीवेळी नोटीस जारी केली.

### काय आहे प्रकरण ?

**१** हा दर्गा उत्तनच्या मौजे चौक येथील सर्वे क्रमांक २ वरील १० हजार चौरस फुट जागेत बांधण्यात आला असून उत्तनच्याच मौजे तारोडी येथील सर्वे क्रमांक ३७ वरील ५७ हेक्टरवरील तिवर क्षेत्र नष्ट करून दर्ग्याच्या ट्रस्टकडून त्यावर कब्जा केल्याचा दावा करण्यात आला आहे.

**२** या जागांच्या सातबाऱ्यावर बाले पीर शाह ट्रस्टचे नाव चढविण्यासाठी ट्रस्टच्या सचिवांनी १० ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज केला होता. तो अर्ज अप्पर तहसीलदार निलेश गौंड यांनी फेटाळून लावित त्यासाठी ठोस कागपत्रे सादर केली नसल्याचे स्पष्ट केले. तर तत्कालीन अप्पर पोलीस अधिक्षक संग्रामसिंह निशाणदार यांनी राज्य शासनाला १८ ऑक्टोबर २०११ रोजी दर्ग्याच्या बेकायदेशीर अस्तित्वासह तेथील संभाव्य संवेदनशील घटनांबाबतचा अहवाल पाठविला होता.

**२** त्यात त्यांनी दर्ग्याचे ठिकाण उत्तन समुद्र किनारपट्टीवर व वसई खाडीच्या मुखाशी असलेल्या चौक जेट्टीलगत असुन या ठिकाणापासून ५ ते ६ किलोमीटर अंतरावर मुंबईची हद्द सुरु होते. मुंबई शहरावर यापूर्वी दहशतवाद्यांनी समुद्र मार्गाने हल्ला केला असून भविष्यात दहशतवाद्यांचे मुंबई शहर लक्ष्य ठरण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे स्पष्ट केले होते. समुद्रमार्गासाठी लँडिंग पॉइंट म्हणुन गैरवापर होण्याची शक्यता अहवालात वर्तविण्यात आली होती.

पुढारी पान क्र. 3

# भाईंदरमध्ये ३४ मद्यपी वाहन चालकांवर कारवाई

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भाईंदर शहरात होळी व धुलीवंदनाच्या दिवशी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या ३४ जणांवर काशीमीरा वाहतूक शाखेने कारवाई केली आहे. तर इतर ट्रिपल सीट, सीटबेल्ट न लावणे हेल्मेट न वापरणे अशा एकूण ५९ जणांवर कारवाई केली आहे.

मीरा भाईंदरमध्ये होळी व रंगपंचमीनिमित्त नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता. वाहतूक पोलिसांनी सात स्थानिक पोलीस ठाण्यांतील पोलिसांच्या सहाय्याने ३४ वाहनचालकांवर होळी आणि त्यानंतरच्या रंग-पंचमीच्या दिवशी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे.

मद्यपान करून वाहन चालविण्याच्या ३४ प्रकरणांव्यतिरिक्त, ५९ दुचाकीस्वारांवर ट्रिपल-सीट आणि हेल्मेट न घालणारे व इतर वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. वाहतूक पोलिसांचा कडक बंदोबस्त लावल्यामुळे व वाहतूक शाखेकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. या वर्षी अशा घटनांमध्ये घट झाली असल्याचे वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास हंडोरे यांनी सांगितले आहे.

CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. १

# मिरा-भाईंदरमध्ये महायुती एकत्रित काम करणार

## वरिष्ठांच्या कानउघडणीनंतर स्थानिक नेत्यांची नरमाई

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमधील वाट तूर्तास मिटला आहे. दोन्ही पक्षांच्या वरिष्ठांनी स्थानिक नेत्यांची कानउघडणी केल्यानंतर दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी मतभेद विसरून आता महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करणार असल्याचे सांगितले आहे.

काही दिवसांपासून मिरा - भाईंदरमध्ये भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता आणि शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांच्यातील वादामुळे संघर्ष पेटला आहे. सरनाईक यांच्यामुळे मागील विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याचा मेहता यांचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी भाजपचे माजी नगरसेवक अरविंद शेट्टी यांनी सरनाईकांवर गंभीर आरोप केल्यानंतर कटुता वाढली होती. मेहता यांनी ही संधी साधत संपूर्ण भाजप पक्षाला सरनाईकांविरोधात उभे केले होते. दोघांमधील हा वाद इतका शेगेला पोहोचला की भाजप व शिवसेना या (पान ३ वर)

### गिल्बर्ट मेन्डोसांच्या भूमिकेकडे लक्ष

एकेकाळी मिरा-भाईंदर शहरावर वर्चस्व असणारे माजी आमदार गिल्बर्ट मेन्डोन्सा यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चढाओढ लागली आहे. मेन्डोन्सा हे राष्ट्रवादी पक्षाचे माजी आमदार असल्यामुळे त्यांचे पूर्वीपासून शरद पवार यांच्याशी जवळचे संबंध आहेत. तुरुंगात असताना त्यांना एकनाथ शिंदे व राजन विचारे यांनी मदत केल्याने त्यांनी बाहेर येताच शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता. मेन्डोन्सा आपल्याच बाजूने असल्याचा विश्वास राजन विचारे यांना आहे. तर मेन्डोसांनी शिंदे यांना समर्थन दिल्याचा दावा शिंदे गटाने केला आहे.

## महायुती एकत्रित काम करणार

*(पान १ वरून)* दोन्ही पक्षाच्या जिल्हाध्यक्षांनी पोलीस ठाण्यात पत्र देऊन एकमेकांविरोधात कारवाईची मागणी केली. इतकेच नव्हे तर लोकसभेसाठी शिवसेनेचा उमेदवार उभा राहिल्यास प्रचार करणार नसल्याचा थेट इशारा भाजपने दिला होता. या वादाचा फायदा महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांना होणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे हा वाद मिटविण्यासाठी दोन्ही पक्षाच्या वरिष्ठांनी पुढाकार घेतला आणि वाद मिटवून एकत्र कामाला लागण्याचे आदेश दिले. याबाबत जिल्हाध्यक्ष राजू भोईर यांना विचारणा केली असता त्यांनी कोणत्याही परिस्थितीत युतीधर्म पाळणार असल्याचे सांगितले. महायुतीच्या उमेदवाराला जिंकून आणण्यासाठी भाजपबरोबर एकत्रित काम करणार असल्याचे सांगितले. शिवाय एखादा कार्यकर्ता यात नाराज असल्यास तो त्याचा व्यक्तीगत निर्णय असू शकतो. दोन्ही पक्ष एकत्रित प्रचार करणार असल्याचे भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी दिली आहे.

लोकसत्ता पू. पान क्र. ५

# ५० मोबाइल तक्रारदारांना परत

**वसई :** नया नगर पोलिसांनी नागरिकांचे हरवलेले ५० मोबाइल परत मिळवले आहेत. पोलीस ठाण्यात झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात तक्रारदार नागरिकांना हे मोबाइल परत करण्यात आले.

मोबाइल ही प्रत्येकाच्या दैनंदिन वापरातील अत्यावश्यक वस्तू आहे. परंतु रोजच्या धावपळीत, प्रवासात अनेकदा मोबाइल गहाळ होत असतात. मोबाइल हरवल्यावर त्याचा गैरवापर होण्याचीही शक्यता असते. नया नगर पोलिसांकडे मोबाइल गहाळ झाल्याच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. पोलिसांनी मागील चार महिन्यांच्या तक्रारींचा तपास करून ५० मोबाइल परत मिळवले आहेत.

भारत सरकारच्या सीईआयआर पोर्टलवर माहिती भरून तांत्रिक तपास करून हे मोबाइल परत मिळविण्यात आले आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे, पोलीस निरीक्षक अब्दुल हक देसाई आदींच्या पथकाने हे मोबाइल परत मिळविण्यात यश मिळवले. परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, नवघरचे साहाय्यक आयुक्त राजेंद्र मोकाशी यांच्या हस्ते तक्रारदार नागरिकांना त्यांची ओळख पटवून हे मोबाइल परत करण्यात आले.

# ऑनलाइन फसवणुकीतील रक्कम परत

**वसई :** क्रेडिट कार्ड रिवार्ड पॉइंटच्या नावाखाली विरार येथील एका व्यक्तीची दीड लाखाची फसवणूक झाली होती. या ऑनलाइन फसवणुकीतील रक्कम परत मिळवून देण्यास सायबर पोलिसांना यश आले आहे.

विरार येथील प्रताप नावाच्या व्यक्तीची क्रेडिट कार्ड रिवार्ड पॉइंट रिडिम करण्याच्या नावाखाली ऑनलाइन फसवणूक करण्यात आली होती. याबाबत सायबर पोलिसांकडे तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारींनंतर ऑनलाइन स्वरूपात तपास व माहिती घेत यात फसवणूक झालेले १ लाख ४८ हजार ९०० रुपये परत मिळवून देण्यात सायबर पोलिसांना यश आले आहे. ही कामगिरी पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहायक पोलीस निरीक्षक स्वप्निल वाव्हळ, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर यांनी केली आहे.

CS CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. 4

# एव्हरशाइन-अंबाडी रस्त्याचे काम संथ

## खडतर प्रवासाने नागरिक हैराण

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्येतून सुटका व्हावी यासाठी वसई पूर्वेच्या अंबाडीपूल ते एव्हरशाइन रस्त्याची उंची वाढविण्याचे काम सुरू आहे. परंतु हे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना खडतर प्रवास करावा लागत आहे.

मागील काही वर्षांपासून वसई-विरार शहरात पावसाळ्यात पूरस्थितीची समस्या निर्माण होत आहे. दरवर्षी या पूरस्थितीमध्ये अंबाडी ते एव्हरशाइन हा रस्तासुद्धा पाण्याखाली जातो. त्यामुळे येथील वाहतूक व्यवस्था पूर्णतः ठप्प होते. ही समस्या सुटावी यासाठी महापालिकेने एव्हरशाइन ते अंबाडी पुलापर्यंतच्या रस्त्याची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. एक मीटरने ही उंची वाढविली जात आहे. यासाठी साडेसात कोटी रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.



मागील दोन महिन्यांपासून हे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने त्याचा फटका प्रवाशांना बसू लागला आहे. रस्त्यावर दोन्ही बाजूने मातीभराव टाकण्यात आला आहे. या खडतर रस्त्यावरून धूळखात प्रवास करावा लागत आहे. काहीवेळा या कामामुळे प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या रस्त्याचे काम करताना नियोजन न केल्याने आता त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. खडबडीत रस्ता असल्याने हादरे बसतात.

विशेषतः आजारी रुग्ण, गर्भवती यांच्यासाठी ते अधिकच धोकादायक असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. एकतरी मार्गिका डांबरीकरण करून सुरळीत करण्यात यावी, याशिवाय या कामाला गती देण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### रस्त्यालगतच्या परिसराला फटका

पावसाळ्यात वाहतुकीस अडचण नको म्हणून रस्ता पालिकेकडून उंच करण्यास घेतला आहे. या कामातून रस्त्याची उंची वाढल्याने रस्त्यावर पाणी साचणार नसले तरी रस्त्यालगतच्या परिसरात पाण्याची पातळी वाढून वसंतनगरी आणि एव्हरशाइनमध्ये राहणाऱ्या लाखो लोकांना पुराचा फटका बसणार आहे. मधुबन परिसरात संकुलाचे नवीन बांधकाम सुरू झाल्यापासून या परिसरात पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. तसेच मधुबन परिसरात संकुले उभारण्यासाठी अनेक नैसर्गिक नाले बुजवण्यात आले आहेत. त्याकडे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राज दसोनी यांनी केला आहे.



### वाहनचालकांची वाटमारी

एव्हरशाईन-अंबाडी रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. या कामामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. त्यामुळे आता वाहनचालक वाटमारी करीत मिळेल त्या जागेतून वाहने टाकून प्रवास करू लागले आहेत.

सकाळ पान क्र. 5

## पोलिस भरतीच्या अर्जांना मुदतवाढ

पुणे, ता. २७ : राज्यातील पोलिस भरतीच्या अर्जांना १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. शासनाने पूर्वी ३१ मार्चला अर्ज करण्याची अंतिम तारीख दिली होती. मात्र कागदपत्रांसाठी काही तांत्रिक अडचणी उद्भवत असल्याचे उमेदवारांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे अर्जासाठी १५ दिवसांचा जास्तीचा कालावधी मिळणार आहे.

पोलिस विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार ३१ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याबाबत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध केली आहे. राज्य शासनाने मराठा आरक्षण विधेयक नुकतेच संमत केले असून त्याची अंमलबजावणी प्रक्रिया शासन स्तरावर सुरू आहे. त्याप्रमाणे उमेदवारांना एसईबीसी प्रमाणपत्र मिळविण्यास विलंब होत आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी अंतिम मुदत १५ एप्रिलपर्यंत देण्यात येत आहे.

सकाळ पू. पान क्र. 3

# शांतता-सुव्यवस्थेसाठी पोलिसांकडून नियम लागू

## मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

वसई, ता. २७ (बातमीदार) : आचारसंहिता लागू झाल्याने नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांकडून मोर्चे, आंदोलने, निदर्शने, तसेच सणांच्या प्रसंगी गैरकृत्य करताना आढळल्यास मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या पोलिसांच्या कारवाईचा दंडुका बसणार आहे. यासंदर्भात पोलिसांनी मनाई आदेश लागू केले आहे. नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गुड फ्रायडे २९ मार्चला असून, त्यानंतर ईस्टर संडे (ता. ३१), ९ एप्रिलला गुढीपाडवा, तसेच ११ एप्रिलला रमजान ईद आहे. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहावी, म्हणून मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाचे पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी हे आदेश काढले आहे. त्यानुसार आयुक्तालय कार्यक्षेत्रातील एकूण १८ पोलिस ठाणे कार्यक्षेत्रांमध्ये खबरदारी घेण्यात आली आहे.

समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे, यासाठी सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मनाई आदेश लागू केले आहेत. त्यामुळे शरीराला इजा करण्यासाठी वापरण्यात येईल, अशी कोणतीही वस्तू बाळगणे, दगड अथवा साधने जमा करणे, कोणत्याही दाहक अथवा स्फोटक पदार्थांची वाहतूक, सार्वजनिक घोषणा करणे, गाणी म्हणणे, पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे आदी कृत्य केल्याचे आढळल्यास कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

### या कामासाठी सवलत

- लग्न कार्यासाठी जमलेले लोक.
- प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी आलेले नातेवाईक.
- सरकारी, निमसरकारी कामासाठी न्यायालयात जमलेले लोक.
- सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.
- पोलिसांनी परवानगी दिलेल्या सभा, मिरवणुका.
- शासकीय/निमशासकीय कर्मचारी कर्तव्य पार पाडत असलेली ठिकाणे.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय परिसरात हे मनाई आदेश १२ एप्रिलपर्यंत असणार आहेत. त्यांचा भंग करणाऱ्याविरोधात कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

- सुहास बावचे, उपायुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय

सकाळ पू. पान क्र. 1

## समुद्रात बुडून तरुणाचा मृत्यू

बोळिंज, ता. २७ : धुळवड साजरी करून झाल्यानंतर वसईच्या कळंब समुद्रकिनारी सोमवारी (ता. २५) संध्याकाळी अंघोळ करण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. साई किरण चेनुरी असे या मृताचे नाव आहे.

वसई-विरार शहरात सोमवारी धुळवड साजरी करण्यात आली. काही नागरिकांनी समुद्रकिनाऱ्यावरसुद्धा धुळवडीनिमित्ताने गर्दी केली होती. वसई पूर्वेच्या गोखिवरे परिसरात राहणारा साई किरण हासुद्धा कळंब समुद्रकिनारी गेला होता. धुळवड साजरी करून झाल्यानंतर तो समुद्रात अंघोळ करण्यासाठी उतरला. पाण्याचा अंदाज न आल्याने तो समुद्रात बुडाला. त्याचा शोध जीवरक्षक व पोलिसांकडून सुरू होता. रात्री उशिरापर्यंत त्याचा मृतदेह सापडला नव्हता. मंगळवारी (ता. २६) त्याचा मृतदेह वसई भुईगाव येथील समुद्रकिनारी आढळून आला. याप्रकरणी वसई पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद आहे.

CamScanner

सकाळ पू. पान क्र. १

# पोलिस भासवून दरोडा घालणाऱ्यांना अटक

## पाच कोटींचा मुद्देमाल हस्तगत; चालकच गुन्ह्याचा मास्टरमाईंड

विरार, ता. २७ (बातमीदार) : महामार्गावरील खानिवडे टोलनाका येथे पोलिस असल्याचे बतावणी करत गुजरातमधील अंगाडीयांवर घातलेल्या दरोड्याची उकल करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पथकाला यश आले. याप्रकरणी चार संशयितांना अटक करून चार कोटी ८७ लाख रोकड, दोन कार, पाच मोबाईल असा एकूण पाच कोटी तीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या गुन्ह्यातील तीन आरोपी पसार आहेत.

गुजरातच्या केडीएम अँड एमटेक अंगाडीया कंपनीची पाच कोटी १५ लाखांची रोख रक्कम घेऊन तीन कर्मचारी सुरतमधून मुंबईसाठी १७ मार्चला कारने निघाले होते. त्याच रात्री खानिवडे टोलनाक्याजवळ दुसऱ्या कारमधून आलेल्या आरोपींनी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना पोलिस असल्याची बतावणी करून मारहाण करत रोख रकमेसह आरोपी पळून गेले होते. या प्रकरणी मुरगनंदन अभिमन्यू (वय ४६), बाबू मोडा स्वामी (वय ४८), मनीकंडन चलैया (वय ५०) आणि बालाप्रभू शनमुगम (३९) यांना ताब्यात घेऊन अटक केले. त्यांना वसई न्यायालयाने २८ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

अंगाडीया कंपनीतील चालक बाबू स्वामी यानेच आरोपींना रोख रक्कम घेऊन निघाल्याची माहिती दिली होती. त्याच्या माहितीवरून हा प्लॅन आखल्याचे तपासात उघड झाले.



विरार : पोलिसांनी संशयित आरोपींकडून कोट्यवधींची रोकड ताब्यात घेतली.

पुण्यनगरी पू. पान क्र. १

## आ. ठाकूर राजा सिंह यांच्याविरोधात गुन्हा

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये २५ फेब्रुवारी रोजी काशिमिरा नाका ते एस. के. स्टोन येथे रॅली काढण्यात आली. या रॅलीत चिथावणीखोर भाषण दिले, तसेच दोन समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य केल्याने मीरा रोड पोलीस ठाण्यात आयोजक व हैद्राबाद येथील भाजप आ. टी. राजा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीरा-भाईंदर शहरात २५ फेब्रुवारी रोजी सकल हिंदू समाजाकडून रॅलीचे आयोजन नरेश निळे यांनी केले होते. रॅलीला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. त्यानंतर आयोजक परवानगी मिळवण्यासाठी न्यायालयात गेले होते. त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना भडकावू व द्वेषपूर्ण आणि चिथावणीखोर भाषण देऊ नये, या अटी-शर्तीवर कार्यक्रमाला परवानगी दिली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून रॅली काढण्याच्या दिवशी दोन समाजात तेढ निर्माण होईल, असे कृत्य केल्याने आ. ठाकूर राजा सिंह व नरेश निळे यांच्याविरोधात मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ७५ तळीरामांवर पोलिसांची कारवाई

**नालासोपारा :** होळी, धूलिवंदन सणाला रंगाचा 'बेरंग' करणाऱ्या ७५ तळीरामांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. दारू पिऊन वाहन चालवणे हा कायद्याने गुन्हा आहे. हे माहिती असूनही नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई केली. नालासोपारा, वसई, विरार व नायगाव परिसरातील मुख्य रस्ते, नाके, चौक येथे पोलिसांनी धूळवडीच्या दिवशी नाकाबंदी केली होती. समुद्र किनाऱ्यांसह संवेदनशील ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला होता. नशेखोरांना रोखण्यासाठी केलेल्या बंदोबस्तात वाहतूक पोलीस आणि शहरी पोलिसांनी ७५ तळीरामांवर दंडात्मक कारवाई केली.

CamScanner